जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस

P.R.O. Office, Crime Branch, Pune City

**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001

**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

# दैनंदिन गुन्हयाची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.१३/०२/२०२१

## दि.१२/०२/२०२१ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरुड पो स्टे ३८/२०२१,भादविक १०९,१२०(ब),३२३,३२७,३३०,३३६,३३७,३४१,३४२,३४७, ३४८,३५२,३९२,३९३,४०५,४०६,४२५,४२६,४२७,४४०,४४२,४४८,४५१,४५२,४५३,४५४,४५५,४६१,५०४, ५०६,५०९,५११ सह ३४ प्रमाणे. |
| **फिर्यादी** | अनिल आकोलकर, वय ५४ वर्षे, रा.खडकवासला पुणे. |
| **आरोपी** | १) प्रकाश वरघडे वय ४५ वर्षे, व इतर पाच ते सहा (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०८/११/२०२० रोजी ते १४/०१/२०२१ वा. च्या दरम्यान सर्व्हे नं-८८/१५ मित्र प्रेम वरघडे चाळ, गुजरात कॉलनी, कोथरुड, , पुणे येथे घडला असे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे यातील नमुद क्र.१ याचेकडे नमुद केले ठिकाणी भाडेतत्त्वार राहण्यास असुन इतर इसम यांनी आपसात संगनमत करुन कट रचुन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन फिर्यादीस दिलेली आश्वासने न पाळुन फिर्यादीकडुन त्यांची सही घेतलेला १००/- रु. चा स्टॅम्पपेपर रजि. नोंदणी करुन देतो असे बोलुन फिर्यादीस तो परत न करता स्वतःजवळ ठेवुन घेतले तसेच फिर्यादीने सदर दस्त मागितले असता ते परत करण्यास टाळाटाळ केली. तसेच फिर्यादीच्या समतीशिवाय घरी जावुन फिर्यादीस त्यांचे घरात रहायचे नाही असे बोलुन फिर्यादीच्या घरात जबरदस्तीने घुसुन फिर्यादी व फिर्यादीच्या मुलीच्या अंगावर धावुन जावुन शिवीगाळ करुन, घरातील वस्तुची तोडफोड करुन, वस्तु फेकुन देवुन नुकसान केले तसेच फिर्यादीचे घरातील महत्वाची कागदपत्रे फिर्यादीचे नावे डोमेसाईल,एफएक्स ३ कॅमेरा, एचएमटी ऐश्वर्या मनगटी घड्याळ, मुलीचे जन्माचा दाखला, व इतर वस्तु त्यांच्या सहमतीशिवाय जबरदस्तीने चोरी करुन घेवुन गेले. तसेच इतर साथीदार यांनी फिर्यादीस आम्ही तुम्हाला जिवे मारण्याची सुपारी घेतली आहे तसेच फिर्यादीस मी माझा ब्लाऊज फाडुन घेवुन मी तुमच्या विरुध्द पोलीसात विनयभंगाची तक्रार दाखल करेन असे बोलुन धमकी दिली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.ए.एल.घोडके मो.नं ८८८८८२४२०० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ६१/२०२१,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | संकेत जैन, वय २८ वर्षे, रा. टिंबर मार्केट, पुणे |
| **आरोपी** | अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ११/०२/२०२१ रोजी रात्रौ १९/३० ते दिनांक १२/०२/२०२१ रोजी सकाळी ०९/३० वा. चे दरम्यान २६७/५ टिंबर मार्केट, लडकत पेट्रोल पंपा जवळ, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे मालकीचे पुष्पक प्लाय ॲन्ड विनीअर व त्यांचे शेजारील आर जे स्टील सेंटर या दुकानाचे शटर कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे दुकानाचे शटर उचकटुन ४,२०० रु.रोख व चांदीचे शिक्के असा असा एकुण ८,७०० रु.किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.सुशिल बोबडे,मो.नं ९८२३०७९५९३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ५७/२०२१,भादविक ४२०,४०९,३४. |
| **फिर्यादी** | एक महिला वय ४३ वर्षे रा.घोरपडी पुणे |
| **आरोपी** | तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८ मे २०१९ रोजी पासुन दि. २४ फेब्रु. २०२० रोजी पर्यंत उदय बाग घोरपडी पुणे १३ येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम यांनी आपआपसात संगणमत करुन दि.०८ मे २०१९ रोजी पासुन दि. २४ फेब्रु. २०२० रोजी पर्यंत फिर्यादी कडुन शिपींगचा व्यवसाय करण्यासाठी गुंतवणुक करुन प्रॉफिट देतो असे सांगुन वेळोवेळी एकुण ४७,०८,३३४/- रु. एवढी रक्कम घेवुन कोणत्याही प्रकारचा शिंपींगचा व्यवसाय न करता दिलेले पैसे त्रयस्थ कारणासाठी वापरुन त्यापैकी ११,६७,२००/- एवढी रक्कम परत देवुन अजुन पर्यत ३५,४१,१३४/- रु रक्कम परत न करता फिर्यादी कडुन ५०० रु च्या स्टॅम्प पेपर घेवुन शिपींगच्या व्यवसायाचे ॲग्रिमेंट करतो असे बोलुन त्यावर खोटा व चुकीचा मजकुर लिहुन करार न करता वेगळाच दस्ताऐवज तयार करुन विश्वासघात करुन आर्थिक फसवणुक केली |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. वरपडे मो.नं. ७९७२०५९२२४,९५५२५५७४०५ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ५९/२०२१,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | सुषमा घुले वय ३० वर्षे रा.बोपोडी पुणे. |
| **आरोपी** | अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १२/०२/२०२१ रोजी दुपारी १२/३० वा. ते सायंकाळी ०७/०० वा. फिर्यादी राहते घरी स.नं. ४३ गुरव चाळ, सर्वपल्लाी राधाकृष्ण प्रशाला जवळ बोपोडी पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे राहते घराचे वरचे मजल्यावरील हॉलचे उघड्या दरवाजा वाटे कोणी तरी अज्ञात चोरटयाने घरात प्रवेश करुन कपाटातील ११ हजार रोख रुपये व सोन्याचे दागिने असा एकुण ३,५६,०००/- रु. किमंतीचा माल चोरी करुन नेला आहे |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. शैलेजा शिंदे मो.नं.७७२२०११२५५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**

.